**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४९६९/२०२५**

**नि.क्र. ७ खाली**

(सरकार वि. शांताराम)

## सरकारपक्षातर्फे साक्षीदार क्र. १

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

माझे नाव – संदीप हेमंत थोरात,

वय – ३६ वर्षे,

व्यवसाय – पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं. २४४८

नेमणूक – भिंगार कॅम्प पोलीस स्टेशन, अहमदनगर.

## सरतपास सरकारपक्षातर्फे विधीज्ञ श्रीमती शेलोत यांच्याकडून

दिनांक २१.०६.२०२४ रोजी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार मी, पो.हे.कॉ. शिंदे, घोडके, पो.कॉ. शिरसाठ व दोन पंच असे सदर बाजार भिंगार येथे दुपारी ०४.१५ च्या सुमारास टपरीच्या आडोशास छापा टाकला असता एक इसम तेथे कार्बन, पेन घेऊन बुकवर आकडे लिहीत असताना दिसला, त्या व्यक्तीकडे चौकशी केली असता त्याने त्याचे नाव शांताराम मोहन वाकचौरे, रा. गवळी वाडा, भिंगार असे सांगितले. सदर आरोपी त्या ठिकाणी कल्याण नावाचा मटका हा खेळत व खेळवित होता. सबब, त्याच्या ताब्यातून पंचांसमक्ष कल्याण मटका नावाचे साहित्य व रोख रक्कम रू. १२१०/– जप्त करून त्याचा पंचनामा पो.हे.कॉ. श्री. शिंदे यांनी तयार केला. सदर पंचनामा मला दाखविला. त्यावर श्री. शिंदे यांची सही आहे. त्यांची सही मी ओळखली. त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनाम्यास **नि.क्र.०८** देण्यात येते. त्यानंतर मुद्देमालासह आरोपीस पोलीस स्टेशन येथे हजर केले. या प्रकरणात दिनांक २२.०६.२०२४ रोजी माझ्या फिर्यादीआधारे गुन्हा दाखल झाला. मी फिर्याद दिली. त्यावर ठाणे अंमलदार पो.हे.कॉ. श्री. म्हस्के यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.०९** देण्यात येते. आरोपी कोर्टात हजर आहे.

## <u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री एस. बी. शेख यांच्याकडून</u>

०२. फिर्याद नि.क्र.०९ वर माझी सही नाही. सरतपासात सांगितल्याप्रमाणे संबंधित घटनास्थळावर मी गेलो नव्हतो तसेच आरोपीच्या ताब्यातून कसलेही जुगाराचे साहित्य तसेच रोख रक्कम जप्त केलेली नव्हती त्यामुळे फिर्याद नि.क्र.०९ वर माझी सही नाही, हे म्हणणे खरे नाही. कल्याण नावाचा जुगार खेळण्याकरिता दोनपेक्षा जास्त व्यक्तींचा सहभाग असणे आवश्यक आहे. फिर्याद नि.क्र. ०९ मध्ये कल्याण नावाचा जुगार खेळणारा व खेळविणारा अशा एकाच व्यक्तीचा उल्लेख आहे. कथित जप्त रक्कम रू. १२१०/– बाबत नोटांचा तपशील फिर्याद नि.क्र.०९ मध्ये दिलेला नाही. कथित छाप्याच्या वेळी मी गेलो नव्हतो त्यामुळेच नोटांचा तपशील नमूद नाही, हे म्हणणे खरे नाही. मी खोटी साक्ष दिली, हे म्हणणे खरे नाही.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

*<u>सदर साक्ष खुल्या न्यायालयातील संगणक स्क्रीनवर नोंदणी होतेवेळी दाखविण्यात आली तसेच ती साक्षीदारास वाचून दाखविण्यात आली.</u>*

श्रवणोत्तर स्वीकृत

NARAYAN GANGADHAR DESHPANDE

Digitally signed by NARAYAN GANGADHAR DESHPANDE
Date: 2025.12.04 15:50:42 +0530

( एन. जी. देशपांडे )

दि.०४/१२/२०२५

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदनगर.